******************************************************************************************

# ॥ अध्याय चौथा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ श्रीगुरु म्हणती शिष्यातें । सावध व्हावें शुद्धचित्तें । श्रीमन्नृसिंहयति-वृत्तांतातें । आतां श्रवण करावें ॥ १ ॥ श्रीगुरुलीलामृत पान । करा हो संत साधु विद्वज्जन । होऊनि एकाग्र विमलमन । वेदमथित अनादि जें ॥ २ ॥ हिमालय पर्वतीं यतिवर्य । दीनजन-कल्पतरु आर्य । जगद्धितार्थ दिगंबराचार्य । स्वेच्छाचारें संचरती ॥ ३ ॥ विशाल हिमाचल पर्वतीं । योगी मुनि जपी तपी वसती । निजकार्यार्थ ब्रह्मचारी व्रती । अनुष्ठान करिती संतत ॥ ४ ॥ चीन देशींचीं स्त्रीपुरुषें । वनौषधी शोधितां हर्षें । पाहिलें मुंडी भगव्या वेषें । यतिवर्या तयांनीं ॥ ५ ॥ मग वदती एकमेकांस । हें भूत सैतान राक्षस । किंवा असे कोणी माणस । करिती वल्गना यापरी ॥ ६ ॥ हें रिकामें सोंग काय । वृत्ति दिसते पिशाच्चमय । जादू टोणा तोडगे उपाय । कळत असेल याजला ॥ ७ ॥ उभयतां पोट धरून हांसती । कुचेष्टित वाग्बाणीं निंदिती । म्हणती निरुपयोगी हे यति । वृक्षाआड चलावें ॥ ८ ॥ तेथें वृक्षछाया घनदाट । अनेक पक्ष्यांचा कलकलाट । पाहूनि कामोद्भव अचाट । लागलें नेट विषयाचें ॥ ९ ॥ सारासार सत्यत्वें तत्त्वगूढ । नोळखिती कामी मूढ । अहंकारें देहबुद्ध्यारूढ । होऊन बडबड करिती ते ॥ १० ॥ याहीवरी मद्यपानें मदांध । वाग्जल्पन सक्रोध । स्वप्नीं देखील कैंचा बोध । तयां अविरोध विषयांधा ॥ ११ ॥ संगें घेऊनियां कांता । अहोरात्र करिती एकांता । भोगिती शेवटीं आकांता । पावती विषयमदांध ॥ १२ ॥ माय-बाप-गुरुदेवां । धिक्कारिती सर्व जीवां । बरें वाईट पाप किंवा । पुण्यासही न जाणती ॥ १३ ॥

स्त्रियांसमागमें खावें प्यावें । वस्त्रभूषणीं मिरवावें । अनादर वाग्बाण सोसावे । पुष्पासम स्त्रियेचे ॥ १४ ॥ स्वकीय स्त्री किंवा पराची । आप्त सखे सोयऱ्यांची । हेही मर्यादा-ओळख नसेचि । केवळ पशुतुल्य कामांध ॥ १५ ॥ स्त्रीचें दास्यत्व करिती बळें । मदनविकारें भरले डोळे । योग्यायोग्य कांहीं न कळे । झाले आंधळे कामातुर ॥ १६ ॥ वृक्षाआड भूमीवरी । शयन करिती दुरहंकारी । पाहाती तंव पुरुषाची नारी । बनली सुंदरी सावयवी ॥ १७ ॥ एकमेकांसि निरखिती नीट । विपरीत घडलें स्पष्ट । स्त्रीचा पुरुषावयवासकट । झाला घाट नराकृति ॥ १८ ॥ मग घाबरूनि चकित होती । हें काय संकट ओढवलें म्हणती । एकाकीं विपरीत घडे कवणे रीतीं । कोण दैवत क्षोभलें ॥ १९ ॥ तंव गुहेंत तपस्वी ब्रह्मचारी । देखुनी अंतरीं लज्जित भारी । म्हणती ही यतींद्राचीच माया खरी । सुरनरां अगम्य ॥ २० ॥ नृसिंहसरस्वती इकडे । हांसती पाहूनि निंदकांकडे । तंव तीं भिऊन फोडिती हंबरडे । आक्रोशें कंठ शोषले ॥ २१ ॥ उभयतां थरथरां कांपती । म्हणती विपरीत आम्हुची दैवगति । उन्मत्तपणें निंदिले यति । दुष्कृति आम्हां फळलीसे ॥ २२ ॥ 'द्यावें तैसेंचि घ्यावें । करावें तैसें भोगावें' । आपले अपराध न गणावे । केवढें तरी मूर्खत्व ॥ २३ ॥ मग नृसिंहस्वामीसंनिध । जाऊन प्रार्थिती बहुविध । क्षमा करा जी अपराध । शरणागतां रक्षावें ॥ २४ ॥ दीननाथा पुण्यप्रतापा । प्रवर्तलों आम्ही निंद्यपापा । अपराध्यांवरी मायबापा । आतां कृपा करावी ॥ २५ ॥ हें स्वप्न किंवा भ्रांति । परस्पर विपरीत देह दिसती । किंवा इंद्रजाल माया चित्तीं । लेशही उमज पडेना ॥ २६ ॥ निंदेचें प्रायश्चित्त । आम्हां मिळालें खचित । पूर्वजन्मीचें किंचित् सुकृत । म्हणूनि चरणां देखियलें ॥ २७ ॥ सद्गुरुनाथा दयासागरा । बालान्याय क्षमा करा । करावें पुन्हां पूर्ववत् शरीरां । द्यावें लेंकरां दान हें ॥ २८ ॥ कधीं न ऐकिलें पाहिलें । कोणत्याही प्रकारें न जाणिलें । ईश्वरनियमाविरूद्ध घडलें । लाजिरवाणें लोकांत ॥ २९ ॥ महाराज आपणांसी । ओळखिलें न आम्हीं तामसी ।

आतां आमुची गति कैशी । होईल तें कळेना ॥ ३० ॥ यतींद्र वदती या कामविकारें । महत्क्लेश पावती सारे । काममोहें अंतरीं नुरे । सारासार विचार ॥ ३१ ॥ कामक्रोधें दुःख शोक । साध्य न होती इहपर लोक । जीव सांपडती बंधनीं अनेक । देह सार्थक कदा नव्हे ॥ ३२ ॥ काममोहासी धिक्कारिती । तेचि योगी तोष पावती । तयां ज्ञानें ईश्वरप्राप्ति । विरक्तीसह होतसे ॥ ३३ ॥ यास्तव कामादिक विकार । समूळ त्यागावे अति दूर । विवेक विचार दृढतर । निरंतर पाहिजे ॥ ३४ ॥ मग तीं स्त्रीपुरुषें यतीलागुनी । वदती आपल्या चरणदर्शनीं । पश्चात्ताप पूर्ण झाला मनीं । आतां सद्गुरु तारावें ॥ ३५ ॥ पाहूनि शुद्धांतःकरण । पश्चात्ताप परिपूर्ण । कळवळले सद्गुरु दयाघन । भक्तकामकल्पतरु ॥ ३६ ॥ कृपादृष्टीं अवलोकितां । पूर्ववत् काया झाली तत्त्वतां । स्पष्ट देखूनि उभयतां । वदती भगवंता धन्यधन्य ॥ ३७ ॥ आमच्या देहाचें पादसंवाहन । समर्थ-चरणीं घातलें करून । तरी आपले उपकार कृपाघना । कदाकाळीं न फिटती ॥ ३८ ॥ परोपकार भूतदया । हें ब्रीद आपुले गुरुराया । निंदक कृतघ्नांवरी प्रेम माया । करणें शोभे तुम्हांसिच ॥ ३९ ॥ मग समर्थ आज्ञापिती त्यांसी । सुखें जावें चीन देशीं । इहपर साध्य ईश्वरतत्त्वासी । पावाल तुम्ही निश्चयें ॥ ४० ॥ शिरसा आज्ञा मानून । घालिती साष्टांग लोटांगण । मग स्वदेशीं करिती गमन । गुरुपदचिंतन अहर्निश ॥ ४१ ॥ पुढें तयांसी पुत्र जाहले । तेही समर्थांचे सेवक बनले । सद्गुरुलीलागानीं रंगले । भवपाशविमुक्त होती ते ॥ ४२ ॥ त्या हिमालय गिरीवर । अन्य देशींचीं मनुष्यें चार । मृगया करिती वारंवार । उदरपूर्ती करावया ॥ ४३ ॥ तेथें आम्रवृक्षातळीं । यति बैसले होते उदकाजवळी । हेमंतऋतु शीतकाळीं । स्वानंदमेळीं निमग्न ॥ ४४ ॥ व्याधभयें एक शिशुकुरंग । धांवत आला कंपितांग । वृक्षाआड तो सवेग । समर्थाश्रय करावया ॥ ४५ ॥ समर्थ तयासी कुरवाळिती । भयभीतास अभय

देती । दीनदुर्बळांसी संरक्षिती । तेचि समर्थ बोलिजे ॥ ४६ ॥ दुरूनि पारधी मृगाला । शोधितां वृक्षाखालीं तो दिसला । बंदूक भरूनि तीराला । सज्ज केलें चतुर व्याधीं ॥ ४७ ॥ बंदुकीचे करिती बार । तीर मारिती वरचेवर । तयांचा भयंकर शब्दगजर । होतसे पर्वतीं अपार ॥ ४८ ॥ प्रतिध्वनि फार उद्भवती । पशु जीव घेऊनि पळती । पक्षी दूर उडूनि जाती । भयें प्राणरक्षणार्थ ॥ ४९ ॥ जलांत लपती मत्स्य मगर । अति दूर गेले तृणचर । भयकंपित चराचर । स्मरती परमेश्वर सर्वही ॥ ५० ॥ प्राणी पशुपक्ष्यादिक । तेथें न राहिलें एक । गढूळ दिसूं लागलें उदक । भयंकर पर्वतीं ॥ ५१ ॥ मार्ग मिळे जयांना जिकडे । ते ते धांवत गेले तिकडे । भयें काळीज धडधडे । कांहीं सुचेना अंतरीं ॥ ५२ ॥ वायु झाला असे कुंद । दिशा भासती केवल धुंद । वृक्ष लतापत्र अस्पंद । धुम्रें नभ कोंदाटलें ॥ ५३ ॥ कमल पुष्पांतील भृंग । आंतलें आंत झाले दंग । म्हणती हा काय दुर्घट प्रसंग । आतां श्रीरंगा सांभाळी ॥ ५४ ॥ अशा या प्राणसंकटीं । परमेश्वरा धूर्जटी । तवविना संरक्षिता सृष्टीं । अन्य कोणी न दिसे ॥ ५५ ॥ बंदुकींत गोळ्या छरे । भरूनि मृगासी एकसरें । व्याध मारिती क्रोधभरें । विनाकारण दुर्बळां ॥ ५६ ॥ परी त्या मृगवत्सासह । वृद्ध नृसिंहसरस्वती निःस्पृह । स्वानंदीं निमग्न पितामह । निर्भयें स्वस्थ बैसले ॥ ५७ ॥ डळमळी न कदा आकाश । मेरुपर्वत स्थिर अविनाश । पृथ्वीस बांधितां रज्जुपाश । परी ते अचल अभंग जशी ॥ ५८ ॥ म्हणती शिकार करणारे । कोण बैसलासे बुवा रे । दुःसह बंदुकीच्या बारें । भीत नाहीं सहसाही ॥ ५९ ॥ किती झाडल्या बंदुका । परी ययाच्या एकाही नखा । अणुमात्र देखिल धका । लागला नाहीं कीं ॥ ६० ॥ हे कोणी इंद्रजाल गारूडी । मंत्रतंत्राचे खेळगडी । अथवा औषधी बुट्टी जडी । नाना परवडी जाणती ॥ ६१ ॥ तेथील गुहेंतले तपस्वी । दुरोनि अवलोकिती तेजस्वी । म्हणती कोण महात्मा मनस्वी । निर्भय निःशंक विभूती ही ॥ ६२ ॥ स्वामी

समर्थ व्याधांकडे । पाहूनि फेंकती दोन खडे । तों काय चमत्कार घडे । ज्याचें कुडें त्यापुढेंचि ।। ६३ ।। धरिल्या बंदुका करीं । पुढें मागें खालीं वरी । हालवेना बहु प्रकारीं । चारी व्याध तटस्थ ते ।। ६४ ।। म्हणती हें काय घडलें चमत्कारिक । शरीर तीर आणि बंदूक । चळेना वळेना क्षणएक । यासी उपाय कायसा ।। ६५ ।। चौघे पाहती टकमकां । देहस्मृति नसे एकमेकां । गुहेंतील योगी या कौतुका । अवलोकिती त्या समयीं ।। ६६ ।। व्याधांचें काष्ठवच्छरीर । हातीं बंदुका आणि तीर । पाहतां दिसे भयंकर । विस्मयप्रद प्रसंग तो ।। ६७ ।। शत्रु मित्र निंदक वंदक । समान उदारदृष्टि सम्यक् । हर्षामर्षरहित यतिनायक । शांतमानस सर्वदा ।। ६८ ।। सुखदुःखादि द्वंद्वभेद । स्वप्नींही नसे जया खेद । पूर्णब्रह्म सच्चिदानंद । जगद्गुरु यतिराज ।। ६९ ।। अनायासें जरी मिळालें । अन्नोदक कंदमूळ-फळें । ग्रहण करिती स्वलीलें । श्रीगुरु स्वामी समर्थ ।। ७० ।। बोलावें कीं न बोलावें । स्वस्थ किंवा चंचल व्हावें । हेंहि वृत्तीस नव्हे ठावें । ब्रह्मभावें स्वतंत्र ।। ७१ ।। दूर अथवा समीप । महान् किंवा अल्प । त्रिकालीं नसे हा विकल्प । नृसिंहयतिवर्यासी ।। ७२ ।। ऐसे दयाळु करूनि कृपा । जनां दाविती मार्ग सोपा । अध्यात्म-अधिभूत-अधिदैवत त्रयतापां । निवारिती स्वामिराय ।। ७३ ।। दया क्षमा स्वभावसिद्ध । अंतर्बाह्य शुद्धबुद्ध । वेद-शास्त्रीं पुराणीं प्रसिद्ध । गुरुमहिमा अगाध वर्णिला ।। ७४ ।। तटस्थ झाले व्याध दोन याम । पाहूनि कळवळले आत्माराम । मग तयांसी म्हणती आतां क्षेम । पावा विश्राम सद्धर्मीं ।। ७५ ।। कृपावलोकनें तात्काळीं । चौघांची तटस्थता गेली । देहशुद्धी बरवी आली । गुरु-माउली वळल्यानें ।। ७६ ।। पूर्वींचे ते अनेक छंदी । त्यागूनि मोह मद धुंदी । मग श्रीगुरु-चरणारविंदीं । पश्चात्तापें लोळती ।। ७७ ।। आम्ही मतिहीन मदांध । चुकीनें धरूनि विरोध । केले दयाळा बहु अपराध । दुराचारीं प्रवर्तलों ।। ७८ ।। मृगास्तव आपणांतें । मारिलें उन्मत्तपणीं निर्दयत्वें । महा पाप घडलें आम्हांतें । ऐसें सानुतापें बोलती

॥ ७९ ॥ सर्व शास्त्रीं कथिलें हेंचि जाणा । वृथैव न गांजावें कवणा । ऐसें असतां उन्मत्तपणा । धरूनि केले अन्याय ॥ ८० ॥ मदांध झालों मोहित । कर्में केलीं अनुचित । महतांसी कष्टविलें बहुत । निष्ठुर छलक आम्हीं आहों ॥ ८१ ॥ विनास्वार्थ आम्हीं दुष्टीं । छळिलें समर्थासि पापिष्टीं । तथापि स्वामींची कृपादृष्टी । ढळली नाहीं तिलमात्र ॥ ८२ ॥ कृतघ्नांसी महच्छासन । न होतां जाहले प्रसन्न । महानुभाव स्वामी आपण । त्रिभुवनपालक दयाळु ॥ ८३ ॥ ऐसें बोलतां सद्गद कंठ । उदय पावले भाव अष्ट । प्रेमाश्रू वाहती स्पष्ट । अज्ञान खटपट निमाली ॥ ८४ ॥ एकाग्र झालें शुद्ध चित्त । अंतरात्म्यासी अखंड जडत । झालें संसारशोकरहित । गुरुकृपामृतप्राशनें ॥ ८५ ॥ जप तप विद्यादिक अमोल । अखिल साधनांचें श्रेय विमल । अष्टांगयोगाचें सर्व फल । लाधलें तात्काल गुरुकृपें ॥ ८६ ॥ वर्णाश्रम-विद्याविहीन । कदा न घडलें श्रवण मनन । हिंसन-क्रिया स्पष्ट असून । वळले दयाघन त्यांवरी ॥ ८७ ॥ बहुत जन्मीं जें न होईल । अधिकारावीण न घडेल । सेवेवांचूनि न देववेल । कधींही जाणा कवणासी ॥ ८८ ॥ आपणास मारित असतां । अपराध कांहीं न गणितां । कुल जाति व्याधास न पुसतां । केलें आपणासारिखें ॥ ८९ ॥ दिल्या घेतल्यावांचून । नुसतें न बोलती कोणी वचन । तशांत दुष्ट मारकांसी प्रसन्न । कदापि कोण होईल ॥ ९० ॥ परंतु हें अद्भुत नवल वर्तलें । दुष्ट हिंसकासी उद्धरिलें । यदर्थ श्रीगुरूसि वेदें वर्णिलें । 'दयासागर' म्हणून ॥ ९१ ॥ श्रीगुरुस्वामी परम पवित्र । अतुल सामर्थ्य तें विचित्र । व्याध गाती अपार स्तोत्र । इहपरत्रतारक ऐसें ॥ ९२ ॥ तयां आज्ञापिती गुरु निष्काम । सर्वभूतीं अविरोध प्रेम । संरक्षूनि सत्य स्वधर्म । स्वस्तिक्षेम असा रे ॥ ९३ ॥ शिरीं मानूनि गुर्वाज्ञा । पदांसि नमूनियां शुद्धप्रज्ञा । स्वात्मानुभवुनी गुरुगम्य संज्ञा । गेले आनंदें पारधी ते ॥ ९४ ॥ श्रीगुरुदर्शन थोर महिमा । पारधी पावले योगक्षेमा । निरुपमासी द्यावी उपमा । हें न

घडे अघटित ॥ ९५ ॥ जगाच्या नित्य कल्याणार्थ । महीवरी संचरती गुरुनाथ । भक्तिरहस्य ज्ञान परमार्थ । यथार्थ मार्गा लाविती ॥ ९६ ॥ परोपकारार्थ सोसिती कष्ट । उद्धरिती हिंसक दुष्ट । पुढें कथा परिसावी श्रेष्ठ । कुरंगाची रसाळ ॥ ९७ ॥ हरिणी सोसूनि त्रासा । धुंडाळित निज पाडसा । भयभीत टाकित श्वासा । हांका मारी वत्सासी ॥ ९८ ॥ म्हणे धांव धांव रे बाळ । तुजविना प्राण होतो व्याकुळ । होत आला संध्याकाळ । कोठें सांपडेल निज वत्स ॥ ९९ ॥ कोठें वत्सा गुंतलासी । केव्हां येशील मजपाशीं । क्षुधाशांत्यर्थ स्तनपानासी ॥ त्वरित येईं रे तान्हया ॥ १०० ॥ व्याधांनीं मारिलें असेल । आतां कैचें वत्स भेटेल । मृगीच्या नेत्रांतून प्रेमजल । वाहे घळघळ तेधवां ॥ १ ॥ पुत्रा तुझा भरंवसा मजलागून । वृद्धावस्थेंत करिशी पालन । प्राक्तनदशा अतिहीन । येऊन पडलें संकट ॥ २ ॥ हे विश्वंभर पशुपति । मायबापा वत्साप्रति । भेटवूनि हेतुपूर्ति । करी सत्वर दयाळा ॥ ३ ॥ हरिणी अत्यंत शोकाकुल । तृषार्त गेली उदकाजवळ । मागेंपुढें पाहे अंतराळ । व्याध मारील म्हणूनी ॥ ४ ॥ भयें किंचित् जल प्राशून । करी दिशावलोकन । म्हणे आमचें वसतिस्थान । आम्रतरुतळीं असे कीं ॥ ५ ॥ इकडे मृगीचा पति । शोधी स्त्रीपुत्रांप्रति । चिंताग्रस्त होय चित्तीं । काय होईल कळेना ॥ ६ ॥ मंदगति उदकासंनिध । धैर्यें करी स्वस्थानशोध । तों देखिले मुनीश्वर अगाध । आम्रवृक्षा-तळवटीं ॥ ७ ॥ मग धरूनि मोठा धीर । योगिराजसमीप सत्वर । येऊनि उभा ठाकला मृगीवर । नमस्कारी मनोभावें ॥ ८ ॥ तयासि पाहून नृसिंहयति । प्रसन्नवदनें हांसती । वदती का रे विप्रा आम्हांप्रति । नोळखिसी सांप्रत ॥ ९ ॥ पूर्वींचा तूं आमचा भक्त । होतासि गाणगापुरांत । रोगी ब्राह्मण तूं व्याधिनिर्मुक्त । झालासि आमच्या सेवेनें ॥ ११० ॥ तुझी स्त्री शुद्ध पतिव्रता । पुत्रपौत्रसंतानयुक्ता । परी सत्पुरुष छळिले तुम्ही तत्त्वतां । म्हणूनि पावलां मृगजन्म ॥ ११ ॥ पूर्वपुण्ययोग किंचित् । यदर्थ भेटी आमुची प्रस्तुत । इतक्यांत

मृगीही त्वरित । आली पतीतें भेटावया ॥ १२ ॥ तंव दृष्टी देखिलें बालक । उभयही हर्षलीं तात्कालिक । राज्यपदाहूनि अधिक । मानिती सुख अंतरीं ॥ १३ ॥ पूर्व संस्कार-संस्मृति । वाचा फुटली उभयतांप्रति । ओळखूनि नृसिंहसरस्वती । साष्टांग नमिती तृणचर ॥ १४ ॥ बहुत जन्मांचें सुकृत । आजि फळलें आम्हांप्रत । देखिले पुन्हां श्रीगुरुदत्त । झालों पावन गुरुराया ॥ १५ ॥ पतितपावन करुणासागर । नरहरि दत्तात्रेय गुरुवर । साक्षात् पूर्णब्रह्म परमेश्वर । जगदोद्धारक आपण ॥ १६ ॥ होतां पुन्हा श्रीचरणदर्शन । बहु जन्मींचें उपजलें ज्ञान । जरा जन्म मृत्यु निरसून । ब्रह्मविज्ञान होतसे ॥ १७ ॥ सत्पुरुष-छलनें घडले दोष । अन्यायी आम्ही स्त्रीपुरुष । श्रीचरणस्पर्शें निर्दोष । झालों सांप्रत गुरुवर्या ॥ १८ ॥ पहिला जन्म रोगी ब्राह्मण । द्वितीय वृषभजन्म गौण । स्त्रीसहित कष्टें दारुण । कृषिकर्मीं जुंपलों ॥ १९ ॥ तृतीयजन्म शूद्रजाति । स्त्रीसह वैदुरानगरीं वस्ती । दरिद्र दुःख भोगिलें अति । पुत्र मारिती आम्हांसी ॥ १२० ॥ चतुर्थजन्मीं तंतुकार । स्त्रीसह रोगी क्लेश अपार । काशीक्षेत्रीं वास निरंतर । विश्वेश्वरा सेविलें ॥ २१ ॥ पुण्यक्षेत्रीं घडला व्यभिचार । म्हणूनि पंचम खर जन्म साचार । स्त्रीसह कष्ट सोसिले अनिवार । लत्ताप्रहार कुलालाचे ॥ २२ ॥ सुवर्णकार जन्म षष्ठम । हस्तिनापुर वस्तिग्राम । केलें पुष्कळ हेम-चौर्यकर्म । लोभें धर्म टाकुनी ॥ २३ ॥ निजभार्या पतिव्रता । मुष्टिपिष्ट देई साधुसंता । त्यायोगें सप्तम जन्म आतां । अजिनयोनी पावलों ॥ २४ ॥ आजि व्याधहस्तें मरणसमय । होता खचित कुलक्षय । पदरीं पूर्वपुण्यसंचय । देखिले पाय समर्थांचे ॥ २५ ॥ पुरे झाल्या जन्मखेपा । आतां सोडवा मायबापा । दीनबंधो व्हावी कृपा । त्रिविध तापां निरसावें ॥ २६ ॥ अति दुःखरूप संसार । मायापाश हा अनिवार । जाणूनि गुंतलों साचार । आम्ही केवल मतिमंद ॥ २७ ॥ पाहूनि शिंक्यावरील

कापूस । मार्जार मानी नवनीत सुरस । चाखितां पावे खेदास । तैसें संसारसुख वायां ॥ २८ ॥ प्रेमें अस्थि चघळी श्वान । परी रक्त निघे मुखांतून । प्रपंचसुख त्यापरी असून । मिथ्या मोहें गुंतलों ॥ २९ ॥ काममोहादि लागले पाठी । सोडवा समर्थ जगजेठी । देऊनियां आत्मज्ञानदृष्टी । ठेवा अखंड निजपदीं ॥ १३० ॥ कांहीं न लागे आम्हां गोड । लाधली गुरुचरणाची जोड । बिंबलें गुरुभक्तीचें वेड । अहंपण लया गेलें ॥ ३१ ॥ ऐकूनि बोलती जगत्पाल । सद्धर्माचार पुण्यशील । ब्राह्मणवंशीं जन्म पावाल । बाणेल ज्ञान वैराग्य ॥ ३२ ॥ महाराष्ट्र दक्षिण देशीं । फिरत येऊं स्वक्षेत्रासी । भेटीस याल त्या समयासी । मोक्षसुखासी पावाल ॥ ३३ ॥ मनुष्यजन्मावांचून । न होय अपवर्गसाधन । विक्षेप विघ्नें निरसून । अज्ञान नष्ट होईल ॥ ३४ ॥ मोक्षमार्गाचें प्रमुखद्वार । नृजन्मचि सर्व श्रेयस्कर । श्रीगुरुकुलवास निरंतर । नृजन्में सुलभ होतसे ॥ ३५ ॥ मूक पशु आणि सत्पुरुषांचा । ऐकूनि संवाद स्वहिताचा । गुहेंतील तपस्वीजनांचा । जीव वेधला सलक्ष्य ॥ ३६ ॥ बाणला अनुताप अभंग । धांवत आले चतुर्वर्ग । प्रणतवत्सल प्रभूसी साष्टांग । प्रणिपात करिती तेधवां ॥ ३७ ॥ चीन देशींच्या कामांधासी । दाविलें सहज चमत्कारासी । पावन करून सुप्रसन्नतेंसीं । सुखें स्वदेशीं धाडिलें ॥ ३८ ॥ व्याध हिंसक प्राणघातक । असती तदपराध अनेक । परी क्षमा करूनि पारमार्थिक । ज्ञानोपदेश तयां केला ॥ ३९ ॥ मृगवत्सार्थ दुःखसहन । करूनि वांचविले प्राण । मृगीमृगांस वाचादान । देऊनि पावन केलें तयां ॥ १४० ॥ धन्यधन्य महात्मा आपण । साक्षात्स्वरूप नारायण । आम्हीं आलों अनन्य शरण । सद्गुरुचरणारविंदांतें ॥ ४१ ॥ जनानुग्रहार्थ घेतां अवतार । साधूंच्या परित्राणार्थ साचार । सद्धर्ममार्गासी लावितां सत्त्वर । खल-दुष्ट-विषयी-हिंसकांसी ॥ ४२ ॥ परमपुरुष परमहंस । अकल्पित भेटले आम्हांस । चलावें गुहेंतील आश्रमास । संध्यासमय जाहला ॥ ४३ ॥ येथें शीत वाजेल अति । ऐसें तपस्वी बोलती । तेव्हां

तेव्हां मृगी मृग नमस्कारूनि बोलती । काय आज्ञा आम्हांतें ॥ ४४ ॥ तिन्हीही मृगांच्या मस्तकीं ।
हस्त ठेविला कौतुकीं । कांहीं कालें दक्षिणलोकीं । भेटाल मनुष्यशरीरानें ॥ ४५ ॥ ऐसें बोधूनि गुरुदयाळ ।
आले तपस्व्यांसह उदकाजवळ । स्नान संध्यावंदन निर्मल । करूनि गेले गुहेंत ॥ ४६ ॥ मग मृगांचा कलाप ।
आम्रवृक्षातळीं जलासमीप । घेई निर्भयें विश्रांति झोंप । आनंदमय होउनी ॥ ४७ ॥ पुढिले अध्यायीं श्रोतेसंत ।
श्रवण कीजे कथामृत । गुहेंतील कुशलवृत्त । रसपूरित सुखप्रद ॥ ४८ ॥ हा अलौकिक गुरुशिष्यसंवाद ।
अखंडानंददायी मुक्तिप्रद । वेदोपनिषदरहस्य हें विशद । तुम्हांकरणें कथितसें ॥ ४९ ॥ अखंड कृपेचें भांडार ।
संतसाधुजनांचें माहेर । सात्त्विकभक्त-हेतुपूर्तिकर । श्रीगुरुस्वामी समर्थ हे ॥ १५० ॥ कविवरांचें विश्रांतिस्थान ।
सकल जगताचें जीवन । समस्तांचें पूर्ण समाधान । अत्रिनंदन जगद्गुरु ॥ ५१ ॥ तेचि श्रीस्वामी दत्त ।
अंतरीं वसूनि अखंडित । लेखनस्फूर्ति दासाप्रत । देऊनि स्वलीला वर्णविती ॥ ५२ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत ।
वेदशास्त्र-पुराण-संमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । चतुर्थाध्याय रसिक हा ॥ १५३ ॥ इति श्रीगुरुलीलामृते ।
गुरुशिष्यसंवादे चतुर्थोऽध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥